
# छत्रपती राजर्षी शाहू महाराजांची राष्ट्र उभारणीत भूमिका

संपादक

**प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे**



३८. राजर्षी शाहू महाराजांचे कृषीधोरण व
जलनीती विषयक विचार
प्रा.डॉ.व्ही.पी. सांडूर ........................................ २४५

३९. छत्रपती शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात
राबविलेल्या शिक्षण विषयक योजना
डॉ. शिवराज पाटील ........................................ २५३

४०. जनकल्याणकारी जाणता राजा : राजर्षी शाहू छत्रपती
डॉ. एस. पी. घायाळ ........................................ २६२

४१. राजर्षी शाहू महाराजांचे आरक्षण धोरण व
सामाजिक न्यायाची भूमिका
लेफ्ट. डॉ. अर्चना टाक ........................................ २६९

४२. शैक्षणिक सुधारणा मधील छत्रपती राजर्षी
शाहू महाराजांची भूमिका
प्रा. राठोड अरविंद किशनराव ........................................ २७४

४३. राजर्षी शाहू महाराजांचा शैक्षणिक दृष्टिकोन
प्रा. जोगदंड मकरंद बळीराम ........................................ २८०

४४. राजर्षी शाहू महाराज यांचे शैक्षणिक कार्य
डॉ. जी. एच. पटेल, पांडुरंग विश्वनाथ कांबळे ................ २८५

४५. शैक्षणिक सुधारणावरील छत्रपती शाहू महाराजांची भूमिका
प्रा. डॉ. भिमराव प्रल्हाद उबाळे ........................................ २९०

४६. भारतीय कल्याणकारी अर्थशास्त्राचे आद्यप्रवर्तक
राजर्षी शाहु महाराज - एक अभ्यास
डॉ. एन. व्ही. होदलूरकर ........................................ २९५

४७. छत्रपती राजर्षी शाहू महाराजांचे कृषिविषयक धोरण
डॉ. शंकर हणमंतराव कल्याणे ........................................ ३०४

४८. रयतेचा राजा: लोक राजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज
प्रा. डॉ. रेणुका दशरथराव बडवणे (भवसार) ................ ३०९

४९. आरक्षण धोरणाचे जनक : छत्रपती शाहू महाराज
डॉ. भुजंग विठ्ठलराव पाटील ........................................ ३१३

# ॥ ४१ ॥

# राजर्षी शाहू महाराजांचे आरक्षण धोरण व सामाजिक न्यायाची भूमिका

□□□

लेफ्ट. डॉ. अर्चना टाक

जे पुरुष आपल्या कालखंडातील सुधारणा संबंधीच्या समस्या मांडून त्या सोडविण्याचा प्रयत्न करतात तेच इतिहास घडवितात. इतिहास घडविणारे हे महापुरुष आपल्या कालखंडाच्या पुढील काळात डोकावून पाहतात व आपल्या काळातील समस्या ऐतिहासिक परिस्थितीप्रमाणे सोडविण्यासाठी जनतेशी संपर्क साधून झगडत असतात. याकामी त्यांची इच्छाशक्ती व कळकळ ही इतरांपेक्षा प्रबळ असते,१ असे रशियन विचारवंत प्लेकनोव्ह यांनी आपल्या The Role of Individual in History या ग्रंथात म्हटले आहे. त्यांचे हे विधान राजर्षी शाहू महाराजांना अगदी तंतोतंत लागू पडते. स्वातंत्र्यपूर्व काळात भारतात साडेपाचशेहून अधिक संस्थाने होती. यातील काही संस्थाने आकाराने लहान तर काही मोठी होती. ही सर्वच संस्थाने इंग्रजी राजवटीच्या अधीन राहून राज्यकारभार करत होती. प्रत्येक संस्थानात ब्रिटिश रेसिडेंट नियुक्त केलेले असत. या रेसिडेंटची संस्थानिकांच्या राज्यकारभारावर नजर असे. प्रत्येक संस्थानात इंग्रज सरकारने दिवाण नियुक्त केलेले असत. संस्थानिकांनी आपल्याला मान सन्मान द्यावा, अशी अपेक्षा हे दिवाण व रेसिडेंट बाळगून असत. ते संस्थानिकांना कमी लेखत. संस्थानिकांचा अपमान व छळ करण्यात ते धन्यता मानत असत. अशा काळात राजर्षी शाहू महाराज हे करवीर संस्थानचे छत्रपती झाले होते. परंतु ते इतर संस्थानिकांप्रमाणे नव्हते.एका जहागीरदार कुटुंबात जन्माला येऊन दत्तक विधानाने त्यांचा राजघराण्यात प्रवेश झाला होता. ब्रिटिशांच्या अधीन राहून राज्यकारभार करताना ते सर्वसामान्यांचे असामान्य नेते बनले. राजर्षी शाहू महाराज हे केवळ महाराष्ट्राचेच नव्हे तर भारताचे भाग्यविधाते ठरले. त्यांची १८९४ ते १९२२ ही राज्य कारकीर्द केवळ करवीर संस्थान अथवा महाराष्ट्राचा इतिहासापुरतीच महत्त्वाची ठरली असे नव्हे तर ती सबंध भारताच्या दृष्टीने क्रांतिकारी ठरली.

शिक्षणाचा अभाव, पाश्चात्य सुधारणा व संशोधन याबाबतचे अज्ञान यांमुळे महाराष्ट्रीयन लोक एकोणिसाव्या शतकापर्यंत मध्ययुगीन काळातच वावरत

होते.समाजातील विशिष्ट वर्गाने आपले सामाजिक प्राबल्य टिकविण्यासाठी अंधश्रद्धाळू समाजावर अनेक बंधने लादली होती. अनेक वाईट प्रथा, रूढींचा धर्मामध्ये व समाजामध्ये शिरकाव झाला होता. याच काळात शाहू महाराजांच्या विचारांनी महाराष्ट्रात प्रबोधनाला सुरुवात झाली. हा काळ मध्ययुग व आधुनिक युग यांच्या संक्रमणावस्थेचा काळ ठरला. शाहूंच्या कृतिशीलतेने सामाजिक व धार्मिक सुधारणांना चालना मिळाली व महाराष्ट्राने एका नव्या युगात प्रवेश केला. राज्य ही रयतेची दौलत असते आणि त्यामुळे राज्यपदावर बसून आपण जे काही करणार ते सर्व रयतेसाठीच करायचे, हा दृढनिश्चय शाहू महाराजांनी केला होता. करवीर संस्थानच्या ज्या गादीवर ते विराजमान झाले होते, ती गादी शिवछत्रपतींची गादी होती आणि म्हणूनच कि काय थोरले छत्रपतींच्या कार्याला शोभेल असेच कार्य शाहू महाराजांनी केले.

२ एप्रिल १८९४ या दिवशी करवीर संस्थानाचे छत्रपती म्हणून शाहू महाराजांचा राज्याभिषेक झाला. त्यावेळी अनेक सामाजिक प्रश्न उभे होते. करवीर संस्थानाच्या एकूण लोकसंख्येपैकी केवळ पाच टक्के लोकच ब्राह्मण जातीचे होते. परंतु तरीही सर्व सामाजिक व राजकीय अधिकार याच वर्गाच्या हाती एकवटले होते. ब्राह्मणेतरांना सामाजिक व राजकीय अधिकार कसे द्यावेत?, त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारून त्यांचे जीवन सुखी व समाधानी कसे करावे? हे शाहू महाराजांसमोरील मुख्य प्रश्न होते. ज्ञानाच्या क्षेत्रात ब्राह्मण वर्गाचीच मक्तेदारी असल्याने धर्म, समाज, नीतिनियम, कायदे, न्यायदान, अर्थव्यवस्था व व्यापारआणि सर्वात महत्वाचे म्हणजे प्रशासन यंत्रणा या सर्वांवर ब्राह्मणांचे वर्चस्व होते. राज्यकारभारात ब्राह्मण, पारशी व युरोपियन यांचेच प्रभुत्व होते. सर्व शासकीय योजनांचा लाभ फक्त याच वर्गांना मिळत असे. या वर्गाच्या मनात रयते विषयीतळमळ व जिव्हाळा मुळीच नव्हता. इंग्रज, पारशी व ब्राह्मण या त्रिकुटाच्या हाती करवीर संस्थानची सर्व सत्ता सूत्रे गेली होती. प्रशासनात गोंधळ निर्माण झाला होता. करवीर राज्यामध्ये शिक्षणापासून ते नोकरी पर्यंतच्या ज्या सोयी सवलती उपलब्ध होत्या, त्या सर्व सोयी आणि सवलती ब्राह्मणेतर वर्गाला नाकारण्यात आल्या होत्या. शाहू महाराजांनी राज्यकारभारास प्रारंभ केला त्यावेळी प्रशासनासमोर गंभीर प्रश्न होते. परंतु महाराजांच्या ठिकाणी भविष्याचा वेध घेणारी दूरदृष्टी होती. सर्वसामान्य लोकांच्या जीवनावर नकारात्मक परिणाम करणाऱ्या प्रथा, परंपरा, चालीरीती नष्ट करून सर्वसामान्य लोकांचे जीवन सुखी करावे ही शाहू महाराजांची आंतरिक इच्छा होती. ते मानवतावादी विचारांचे होते. ते केवळ एक आदर्श राजाच होते असे नव्हे तर बहुजन समाजाचे नेते म्हणून त्यांची लोकप्रियता आजही कायम आहे. सर्वसामान्य गोरगरीब जनतेचे

कल्याण करणे, त्यांची पारंपारिक बंधनांमधून मुक्तता करणे, त्यांना सुशिक्षित बनवणे आणि त्यांच्यामध्ये जागृती घडवून आणून त्यांना प्रगतीच्या वाटेवर चालायला लावणे यालाच शाहू महाराजांनी आपले जीवितकार्य मानले व त्यानुसारच आयुष्यभर कार्य केले.

राजर्षी शाहू महाराजांनी प्रशासनातील ब्राह्मण वर्गाचे महत्व कमी करण्यासाठी समाजातील ब्राह्मणेतरांच्या शिक्षणाच्या प्रसाराला सुरुवात केली व गतीही दिली. कोल्हापूर संस्थानचे प्रशासनात ब्राह्मणेतरांना कसलेच स्थान नव्हते. बहुजन समाजातील एखादी व्यक्ती मॅट्रिक परीक्षा पास झाली, तरी अशा व्यक्तीला ब्राह्मणशाही नोकरीपासून वंचित ठेवत असे. भास्करराव जाधव यांनी आपल्या एका लेखात लिहिले आहे की, मराठे विद्येत मागासलेल्याआपल्या प्रजेतील शेकडा ९५ भागाची शोचनीय स्थिती प्रथमच महाराजांच्या लक्षात आली. कोल्हापूर हायस्कूल व कॉलेज स्थापन होऊन कैक वर्ष होऊन गेली परंतु ब्राह्मणेतरास या विद्येचा फारसा लाभ घेता आला नाही. दोन मराठे मॅट्रिकची परीक्षा पास झाले होते. त्यातील एकास हायस्कूलात नेमलेले होते. पण त्याच्याकडे शिक्षकी काम न देता लायब्ररीवरच कुजत ठेवले होते. दुसऱ्याला हुजर्योची नोकरी असल्यामुळे हुजर्याततच राबविले होते. मग इतके शिक्षण झालेल्या मराठ्यांस नोकरीतच प्रवेश मिळत नसे तर त्यात आश्चर्य कसले.कारण कोणतीही परीक्षा न दिलेला एक ब्राह्मण अधिकारी होतो. राजाराम कॉलेज किंवा हायस्कुलात ज्याचे शिक्षण झाले असेल त्यालाच संस्थानाच्या नोकरीत प्रवेश मिळावा असाही हुकूम पूर्वीच्या कारकिर्दीत काढण्यात आला होता. हा हुकूम ब्राह्मणांच्याच फायद्याचा असल्याने त्याचे उल्लंघन होऊ नये म्हणून तो समाज जागरूक असे.[२]

२६ जुलै हा राजर्षी शाहू महाराजांचा जन्मदिवस. जन्मदिवस वगवेगळ्या पद्धतीनी साजरे करण्याची भारतीय परंपरा आहे. करवीर संस्थानचे छत्रपती राजर्षी शाहू यांनी १९०२ यावर्षी आपला जन्मदिवस अनोख्या पद्धतीने साजरा करून आपल्या प्रजेला एक अपूर्व भेट दिली. त्यांनी आपल्या पिढीला दिलेली भेट समस्त भारतवासीयांसाठी क्रांतिकारी ठरली. कोल्हापूर संस्थानातील सरकारी नोकऱ्यांमध्ये पन्नास टक्के जागा मागास वर्गातील लोकांसाठी राखून ठेवणारा अभूतपूर्व असा जाहीरनामा राजर्षी शाहू महाराजांनी २६ जुलै१९०२ रोजी प्रसिद्ध केला. या क्रांतिकारी जाहीरनाम्याचा मराठी तर्जुमा पुढील प्रमाणे:

यादी– रा. रा. नायब खासगी कारभारी निसबत सरकार करवीर यांच्याकडे.

**खासगी कारभारी निसबत सरकार करवीर यांजकडून.**

सध्या कोल्हापूर संस्थानामध्ये सर्व वर्णांच्या प्रजेस शिक्षण देण्याबद्दल व त्यास उत्तेजन देण्याबद्दल प्रयत्न केले आहेत; परंतु सरकारच्या इच्छेप्रमाणे

मागासलेल्या लोकांच्या स्थितीत सदरहू प्रयत्नांस जितके यावे तितके यश आले नाही, हे पाहून सरकारास फार दिलगिरी वाटते.

या विषयाबद्दल काळजीपूर्वक विचारांती सरकारांनी असे ठरविले आहे की, यशाच्या ह्या अभावाचे खरे कारण उंच प्रतीच्या शिक्षणास मोबदले पुरेसे विपुल दिले जात नाहीत, हे होय. त्या गोष्टीस काही अंशी तोड काढण्याकरिता व उंच प्रतीचे शिक्षणापर्यंत महाराज सरकारच्या प्रजाजनांपैकी मागासलेल्या वर्णांनी अभ्यास करावे, म्हणून उत्तेजन दाखल आपल्या संस्थानच्या नोकरीचा आज पर्यंत चालू असल्यापेक्षा बराच मोठा भाग या लोकांकरिता निराळा राखून ठेवणे हे इष्ट होईल, असे सरकारांनी ठरविले आहे. ह्या रीतीस अनुलक्षून महाराज सरकार असा हुकूम करतात की, हा हुकूम पोहोचल्या तारखेपासून रिकामे झालेल्या जागांपैकी शेकडा पन्नास जागा मागासलेल्या लोकास भराव्या. ज्या ऑफिसमध्ये मागासलेल्या वर्गांच्या अमलदारांचे प्रमाण सध्या शेकडा पन्नास पेक्षा कमी असेल तर पुढची नेमणूक ह्या वर्णातील व्यक्तीची करावी.

या हुकुमाच्या प्रसिद्धीनंतर केलेल्या सर्व नेमणुकांचे त्रिमाही पत्रक प्रत्येक खात्याच्या मुख्यांनी सरकारांकडे पाठवावे.

**सूचना** - मागासलेल्या वर्णांचा अर्थ ब्राह्मण, प्रभू, शेणवी, पारशी व दुसरे पुढे गेलेले वर्ण खेरीज करून सर्व वर्ण असा समजावा.

हुजूर आज्ञेवरून, नागेश पांडुरंग भिडे खासगी कारभारी

यासंदर्भात शाहू महाराजांचे चरित्रकार धनंजय कीर यांनी लिहिले आहे की, नवीन युगाच्या आगमनाची घोषणा करणारा अग्रदूत, राजर्षी शाहू महाराजांचा हा जाहीरनामा ब्राह्मण वर्गाला मृत्यू घंटेच्या निनादाप्रमाणे वाटला यात काही आश्चर्य वाटत नव्हते. राजर्षी शाहू महाराजांच्या या जाहीरनाम्याविरोधात वादळ उठले. ब्राह्मण वर्गाने यावर जोरदार टीका केली. लोकमान्य टिळकांनी टीका करताना म्हटले की, कोल्हापूरचे शाहू महाराज यांनी आपल्या राज्यात इतपर रिकाम्या होणाऱ्या जागांपैकी अर्ध्या जागा मागासलेल्या लोकांना आणि अर्ध्या जागा ब्राह्मण, शेणवी, प्रभू, पारशी वगैरे पुढारलेल्या लोकास द्यावयाच्या असा ठराव करून त्याची अंमलबजावणी होण्याकरिता तो आपल्या राज्यात वटहुकूम नुकताच प्रसिद्ध केला आहे. ही खोटी, भ्रामक आणि घातक कल्पना आहे. त्यापासून ब्राह्मणांचेच नव्हे तर संस्थानचे अधिक नुकसान होण्याचा संभव आहे. रिकाम्या झालेल्या निम्म्या जागांवर ज्या मागासलेल्या जातीतील लोकांची नेमणूक करावयाची, त्यांची योग्यता पहावयाची की नाही? मागासलेल्या व पुढारलेल्या जातीमध्ये अशा प्रकारची आवड निवड करून देशाचे हित किंवा संस्थानाचे कल्याण होईल असा जो महाराजांचा समज झालेला आहे तो गैर मुत्सद्दीपणाचा

व असमंजस होय. किंबहुना हे बुद्धी भ्रंशाचे लक्षण आहे असे आम्ही समजतो.

२६ जुलै १९०२ रोजी इंग्लंड येथील वास्तव्यात असताना राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या संस्थानातील मागासवर्गीय प्रजेसाठी प्रशासकीय सेवेमध्ये ५० टक्के राखीव जागा जाहीरनामा काढून घोषित केल्या. आरक्षणाचे हे धोरण लागू करून त्यांनी सामाजिक न्यायाची पेरणी केली. त्यांच्या या धोरणाचे दूरगामी परिणाम केवळ महाराष्ट्रातच नव्हेत तर सबंध भारतावर झाले. स्वातंत्र्योत्तर काळात भारत सरकारने शासकीय सेवेत आरक्षणाबाबत वेळोवेळी नियम जाहीर करून शाहू महाराजांचे हे धोरण प्रत्यक्षात राबविले आहे.

क्षेत्रफळाच्या बाबतीत मोठा असलेल्या आपल्या देशाला ८००० वर्षांपूर्वीपासूनचा इतिहास लाभलेला आहे. या प्रदीर्घ कालखंडात या देशाच्या वेगवेगळ्या भागांवर अनेक राजघराण्यांनी राज्ये केली. अनेक राज्यकर्ते होऊन गेले. साम्राज्यविस्तार करणारे, लढाया करणारे व राज्ये जिंकणारे असंख्य राजे या भारतभूमी मध्ये होऊन गेले. परंतु इतिहासाने ज्यांची दखल घेतली असे लोकोत्तर कार्य समाजक्रांतिकारक राजर्षी शाहू महाराजांनी केले. प्रवाहाच्या विरुद्ध दिशेने ते वाहिले. मळलेल्या, रुळलेल्या या वाटेने वाटचाल न करता नवीन मार्ग त्यांनी शोधून काढले. ज्या मार्गावरून ते गेले तिथे वादळ निर्माण झाले व त्यातून धुळीची लाट निर्माण झाली. ही धूळ आपल्याच अंगावर पडणार आहे याची जाणीव असतानाही त्यांनी त्याची पर्वा केली नाही. कारण त्यांनी आपल्या मनाचा दृढ संकल्प व दृढ निश्चय केलेला होता जगाच्या इतिहासात सामाजिक सुधारणेच्या संदर्भात जॉन हस, जॉन वायक्लिप, पीटर अबेलॉर्ड, रॉजर बेकन आणि मार्टिन ल्युथर या समाज क्रांतिकारकांच्या कार्याचे जसे मूल्यमापन केले गेले, तसे राजर्षी शाहू महाराजांच्या क्रांतिकारी विचारांचे, सुधारणांचे मूल्यमापन दुर्दैवाने जागतिक इतिहासाच्या संदर्भात होऊ शकले नाही.

**तळटीपा :**

१. संपा. कांबळे नारायण, बलांडे व्यंकट, शिंदे संजय, आरक्षण सत्य व विपर्यास, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, ऑगस्ट २००८, पृ. १६५.

२. जाधव भास्करराव, राजर्षी शाहू महाराजांच्या आठवणी, पृ. १५१.

३. कीर धनंजय, प्रेषित राजर्षी शाहू महाराज, पृ. १८०.

४. फडके य. दि., राजर्षी शाहू आणि लोकमान्य टिळक, पृ. २५२.

**लेफ्ट. डॉ. अर्चना टाक**
सहाय्यक प्राध्यापक व इतिहास विभागप्रमुख
राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर

OOO